प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

नोव्हेंबर 20, 2018

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) च्या कलम 35अ खालील निर्देश - पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील को-ऑपरेटिव बँक लि. नाशिक, महाराष्ट्र - मुदतवाढ**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 56 सह वाचित कलम 35अ च्या पोटकलम (1) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने जनहितासाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील को-ऑपरेटिव बँक लि. नाशिक, महाराष्ट्र हयांना मे 19, 2018 रोजीचे व्यवहार बंद झाल्यापासून निर्देश दिले होते. भारतीय रिझर्व बँकेने आता, हया निर्देशांना आणखी सहा महिन्यांसाठी, म्हणजे, नोव्हेंबर 19, 2018 ते मे 18, 2019 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. वरील निर्देशांची एक प्रत जनतेच्या माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे. परिस्थितीवर अवलंबून वरील निर्देशात बदल करण्याचा विचार भारतीय रिझर्व बँक करु शकते. हे निर्देश देण्यात आले हयाचा अर्थ, भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा घेण्यात येऊ नये. बँकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईपर्यंत ती बँक निर्बंधांसह तिचा व्यवसाय करणे सुरु ठेवू शकते.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1169**